## श्रेणी सुधार (Class Improvement) करीता नियमावली/पध्दत

***जे विद्यार्थी सोलापूर विद्यापीठातंर्गत महाविद्यालयातून M.A/M.Com व M.Sc. परीक्षा उत्तीर्ण (Pass) असतील त्यांना श्रेणी सुधार करण्यासाठी श्रेणी सुधार पध्दतीचा अवलंब करता येईल .**

१. विद्यार्थ्याने M.A/M.Com **व** M.Sc. श्रेणीमध्ये सुधार करीता अर्जासोबत महाविद्यालयात द्यावयाचे कागदपत्रे खालील प्रमाणे असे.

अ) M.A/M.Com **व** M.Sc. उत्तीर्ण झालेले पूर्ण वर्षाचे गुणपत्रिकेचे झेरॉक्स.

ब) सोबत आलिकडील काळातील २ फोटो.

२. जे विद्यार्थी M.A/M.Com **व** M.Sc. उत्तीर्ण आहेत व ज्या विद्यार्थ्यांना श्रेणीमध्ये सुधार करावयाचा आहे (Class Improvement) अशा विद्यार्थ्यांना ते M.A/M.Com **व** M.Sc. परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासुन ६ वर्षाच्या कालावधीमध्ये अशी श्रेणी सुधारची परीक्षा देण्यासाठी केवळ ३ संधी असतील.

३. जे विद्यार्थी प्रथम वेळेस श्रेणी सुधार (Class Improvement) परीक्षेसाठी प्रवेशित होतील त्यांनी नोंदणी (Registration) व परीक्षा अर्ज (Exam Form) भरणे आवश्यक आहे.

४. श्रेणी सुधारसाठी विद्यार्थ्यांना जे समकक्ष विषय (Equivalence) उपलब्ध आहेत त्या विषयाची परीक्षा देणे बंधनकारक राहील.

५. श्रेणी सुधार परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा ही सत्रनिहाय **(Semester-Wise)** देणे बंधनकारक राहील.

६. सदर विद्यार्थ्यांचे श्रेणी सुधार परीक्षा ही दरवर्षी अंदाजे मार्च/एप्रिल दरम्यान होतील तथापि परीक्षा अर्ज हे अंदाजे माहे जुलै/ऑगस्ट दरम्यान भरावयाचे आहे याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी.

७. सत्र पध्दतीनुसार (Semester-wise) पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधार परीक्षेसाठी M.A/M.Com **व** M.Sc. या अभ्यासक्रमातील एकुण विषयांपैकी कोणतेही **४ विषय** घेऊन परीक्षा देणे बंधनकारक असून सदर विद्यार्थ्यांच्या ईच्छेनुसार ४ पेक्षा अधिक विषयांमधून परीक्षा देऊ शकतो.

८. तसेच वार्षिक सत्र पध्दतीनुसार (Annual) पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधार परीक्षेसाठी M.A/M.Com **व** M.Sc. या अभ्यासक्रमातील एकुण विषयांपैकी कोणतेही **२ विषय** घेऊन परीक्षा देणे बंधनकारक असून सदर विद्यार्थ्यांच्या ईच्छेनुसार २ पेक्षा अधिक विषयांमधून परीक्षा देऊ शकतो. **सदरच्या विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधार परीक्षा ही सत्रनिहाय (Semester-Wise) देणे बंधनकारक आहे.**

९. श्रेणी सुधार परीक्षेसाठी विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार विहित मुदतीत नोंदणी करून परीक्षा अर्ज महाविद्यालयास सादर करावे लागतील.

१०. ज्या विद्यार्थीचे श्रेणी सुधार (Class Improvement) करीता नोंदणी करण्यात आलेले आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा व निकालाबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

११. ज्या विद्यार्थ्यांची श्रेणी सुधार (Class Improvement) करीता नोंदणी करण्यात आलेली आहे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षेचे, निकालाचे, गुणतपासणी/पडताळणी व पेपरचे छायांकित प्रत इ. विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार केले जाईल.

१२. श्रेणी सुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना शिषवृत्ती व पारितोषिके व गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणार नाही.

१३. श्रेणी सुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ होवून श्रेणी सुधार करण्यास अपयशी (Fail) झाल्यास विद्यार्थ्याने पूर्वीचे मिळालेले गुण ग्राह्य धरावे.

१४. ज्या विद्यार्थ्यांची श्रेणी सुधारली जाईल अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा **मुळगुणतक्ता** (Original Marklist) व पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate) विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करावे जमा न केल्यास अशा विद्यार्थ्याना श्रेणी सुधार झालेले गुणतक्ता अथवा पदवी प्रमाणपत्र दिली जाणार नाहीत.

१५. ज्या विद्यार्थी श्रेणी सुधार (Class Improvement) करीता नोंदणी करून परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होतील अशा विद्यार्थ्यांनी पुनःश श्रेणी सुधार (Class Improvement) करीता नोंदणी (Registration) व परीक्षा अर्ज (Exam Form) भरणे आवश्यक आहे.

**********

## B.A. द्वि-पदवी (Re-degree) करीता नियमावली/पध्दत

**जे विद्यार्थी सोलापूर विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातून B.A. परीक्षा उत्तीर्ण (Pass) असतील त्यांना द्वि-पदवी (Re-degree) करण्यासाठी द्वि-पदवी पध्दतीचा अवलंब करता येईल.**

१. विद्यार्थ्याने द्वि-पदवी Re-degree अर्जासोबत महाविद्यालयात द्यावयाचे कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत:

अ) B.A. उत्तीर्ण झालेले पूर्ण वर्षाचे गुणपत्रिकेचे झेरॉक्स.

ब) सोबत आलिकडील काळातील २ फोटो.

२. B.A. II Year Optional ला जो विषय आहे त्या विषयामध्ये Re-degree करता येईल.

३. B.A. II Year Optional ला जो विषय निवडणार आहेत अशा विद्यार्थ्यांना English Compulsory विषय वगळता उर्वरीत ५ ऐच्छिक (Optional) पेपर घेणे आवश्यक आहे.

४. B.A.(Re-degree) करीता नोंदणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी सत्रनिहाय (Semester-Wise) परीक्षा देणे बंधनकारक आहे.

५. B.A.(Re-degree) साठी विद्यार्थ्यांनी जे **समकक्ष विषय (Equivalence)** उपलब्ध आहेत त्या विषयाची परीक्षा देणे बंधनकारक राहील.

६. ज्या विद्यार्थीचे द्वि-पदवी B.A.(Re-degree) करीता नोंदणी करण्यात आलेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबतची व निकालाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

७. सदर विद्यार्थ्यांचे श्रेणी सुधार परीक्षा ही दरवर्षी अंदाजे मार्च/एप्रिल दरम्यान होतील तथापि परीक्षा अर्ज हे अंदाजे माहे जुलै/ऑगस्ट दरम्यान भरावयाचे आहेत याची विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

८. ज्या विद्यार्थ्यांची द्वि-पदवी B.A.(Re-degree) करीता नोंदणी करण्यात आलेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे, निकालाचे, गुणतपासणी/पडताळणी व पेपरचे छायांकित प्रत इ. विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार केले जाईल.

९. द्वि-पदवी B.A.(Re-degree) परीक्षा मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पारितोषिके व गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणार नाही.

**टिप :१.**विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेशपत्र **Examination>Core/Improvement hall ticket** या लिंकद्वारे **download** करुन घ्यावे.

**२.** विद्यार्थ्यांनी नियमावली काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा. कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द झाल्यास/केल्यास प्रवेश/परीक्षा फी परत केली जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**********